महाराष्ट्र शासन
सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर विभाग, शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर-४४०००१
दुरध्वनी क्रमांक : ०७१२-२५६५१४३
E-mail : ronagpur@dtemaharashtra.gov.in Website : www.rdtenagpur.org.in

जा. क्र.तंशिसं/विकाना/आस्था/का-१/२०२१/2440 दिनांक 02 SEP 2021
**कालमर्यादा/ तात्काळ परिभ्रमणार्थ**

**प्रति,**
**प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन,नागपूर/आर्वी/साकोली/ब्रम्हपूरी/गडचिरोली/गोंदिया**
**प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, चंद्रपूर** /नागपूर
**प्राचार्य, शासकीय हॉटेल मॅनेजमेंट व कॅटरिंग टेक्नॉलॉजी संस्था, नागपूर**
**उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, प्रादेशिक कार्यालय, नागपूर**

विषय : **पदोन्नतीच्या पदांच्या तात्पुरत्या सेवा ज्येष्ठता सुची प्रसिध्द करण्याबाबत.**
**(दिनांक २५.०५.२००४ ते ०१.०१.२०२१)**

संदर्भ:- महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब दिनांक ०७.०५.२०२१

उपरोक्त संदर्भांकित शासन निर्णयान्वये शासकीय सेवेतील सर्व पदोन्नतीची पदे दिनांक २५.०५.२००४ च्या स्थितीनुसार सेवाज्येष्ठतेने तात्पुरत्या स्वरूपात भरण्याबाबत शासन निर्देश असून या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त कार्यरत संस्था व कार्यालयातील पदोन्नतीची पदे वरील शासन निर्णयातील तरतुदीनुसार भरण्याकरीता **कार्यालय अधिक्षक, मुख्य लिपीक, वरीष्ठ लिपीक, कनिष्ठ लिपीक, कार्यदेशक, प्रभारक, ग्रंथालय परिचर, नाईक,** इत्यादी पदोन्नतीच्या **गट-क व गट-ड संवर्गातील कर्मचाऱ्यांची दिनांक** २५.०५.२००४ ते ०१.०१.२०२१ **या कालावधीची तात्पुरती ज्येष्ठतासूची** प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर **ज्येष्ठतासूची या कार्यालयाचे www.rdtenagpur.org.in या संकेतस्थळावर Download सेक्शनमध्ये तसेच सर्व संस्थेच्या ईमेल संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.**

तरी सर्व संस्था प्रमुख यांना सुचित करण्यात येते की, त्यांनी आपल्या आस्थापनेवरील उपरोक्त गट-क व गट-ड संवर्गातील कर्मचाऱ्यांना सदरहु संबंधित ज्येष्ठतासूचीची प्रत आपल्या स्तरावरुन वितरीत करावी. सदर यादीतील पानांची संख्या लक्षात घेता प्रशासकीय खर्च कमी करण्यासाठी सदर सेवा ज्येष्ठता सुची **आपल्या संस्थेतील मुख्य सुचना फलक/विविध विभागातील सुचना फलक तसेच कर्मचाऱ्यांचे व्हॉट्स ॲपवर ग्रूप तयार करून सदर ग्रूप वर उपलब्ध करून देवून व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी. तसेच सदर सुची सर्व संस्थेतील संबधीत सर्व कर्मचाऱ्यांना या कार्यालयाच्या वरील वेबसाईट वरून काढून घेता येईल.** व **कर्मचाऱ्यांनी सुध्दा कार्यालयाची वाट न पाहता ती वेबसाईटवरून उपलब्ध करून घ्यावी.** ज्येष्ठता सुचीबाबत कर्मचाऱ्यांचे काही आक्षेप असल्यास **विशेषतः आपल्या ज्येष्ठता क्रमांकाबाबत** संस्थास्तरावर आक्षेपाचे सबळ पुराव्यासहचे निवेदन दिनांक **१३.०९.२०२१** पर्यंत संबधीत कर्मचाऱ्यांनी संबधीत संस्थेस सादर करावे. व संस्थेनी सदर निवेदनाचे आपल्या कार्यालयाद्वारे पडताळणी करून सदर निवेदन एकत्रीत रित्या खास दुताद्वारे दिनांक **१५.०९.२०२१**

पर्यंत या कार्यालयास पाठविण्यात यावे. संस्थेने दिनांक १३/०९/२०२१ नंतर प्राप्त होणारे निवेदन विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घेण्याबाबत तसेच सदर सेवाज्येष्ठता यादीनुसार सन २०२१ च्या पदोन्नत्या वरील संदर्भांकित शासन निर्णयातील तरतुदीनुसार तात्पुरत्या स्वरूपात करण्याचे प्रस्तावित असल्याचे सर्व संबधीत कर्मचाऱ्यास तसे सुचित करण्यात यावेत.

तसेच तांत्रिक पदांच्या बाबतीत (निदेशक लोहार, सुतार व तत्सम वेतनश्रेणी एस-८ मधील पदे) पडताळणी केली असता सेवाज्येष्ठतेत कसलाही बदल होत नसल्याने यापूर्वीच प्रसिध्द करण्यात आलेली सेवाज्येष्ठता यादी कायम ठेवण्यात येत आहे. तरी सुध्दा संदर्भांकित शासन निर्णयाचे अनुषंगाने सदर पदावर कार्यरत किंवा गट-ड च्या पदावर कार्यरत कर्मचाऱ्यांचे तांत्रिक पदाच्या ज्येष्ठता यादीबाबत काही आक्षेप असल्यास त्यांनी सुध्दा वरील दिनाकांपर्यंत सबळ पुराव्यासह आपले आक्षेप संबधीत संस्थेस सादर करावेत. व संस्थेने विहीत वेळेत या कार्यालयात सादर करावे.

आक्षेपांची माहीती निवेदनासोबत खालील नमून्यात एकत्रीतरित्या सादर करण्यात यावी.

आक्षेपाचा नमूना

| अ.क्र. | कर्मचारी यांचे नांव व पदनाम | सुचीतील क्रमांक | आक्षेपाचा विषय | पूरावा जोडला आहे /नाही | प्राचार्यांचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

( डॉ. भ. भा. डायगव्हाणे )
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,नागपूर

प्रत : १) मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई (कार्यासन क्र.१२)यांना माहितीकरीता मानार्थ सादर.

२. प्रोग्रामर , हेच कार्यालय यांना आवश्यक कार्यवाहीकरीता. त्यांनी सदर ज्येष्ठता सुची या कार्यालयाचे संकेत स्थळावर आजच प्रसिध्द करावी.

३) सबंधित कर्मचारी, हेच कार्यालय यांना माहितीकरीता. त्यांनी सदरहु ज्येष्ठता सूची या कार्यालयाचे संकेतस्थळावरुन उपलब्ध करुन घ्यावी. यादीतील पानांची संख्या लक्षात घेवून प्रशासकीय खर्चात काटकसर करण्यासाठी व मनुष्यबळाचा वापर टाळण्यासाठी सदर कर्मचारी यांना वेगळयाने यादी पूरविण्यात येणार नाही. तसेच या सुचीबाबत कोणाचेही काही आक्षेप असल्यास (विशेषत: ज्येष्ठता क्रमांका विषयी ) दिनांक १३.०९.२०२१ पर्यंत या कार्यालयास सबळ पुराव्यासह निवदेन सादर करावे. सदर दिनांकानंतर प्राप्त होणारे निवेदनाचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.